REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ


**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १४ डिसेंबर, १९३८ | अंक ४९



# किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## *हुगळी पंप*

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

**किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा**

**स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**
त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गांची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी
## लिमिटेड, पुणें.

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.**

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

# विविध माहिती

### जपानच्या निर्गतींत घट

जपान देशाच्या निर्गतींत १९३७ च्या पहिल्या सहामाहीचे मानानें, १९३८ च्या पहिल्या सहामाहींत शेकडा २१ इतकी घट झाली.

### इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंट

लंडनमधील इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटनें १९३७-३८ मध्यें हिंदुस्थानातर्फे मालाबाबत आणि वहातुकीबाबत सुमारें ३० कोटि रुपये किंमतीचीं १२,१०१ कंत्राटें दिलीं.

### गिरण्यांमध्यें कपाशीचा उठाव

ऑक्टोबर, १९३८ मध्यें ब्रिटिश हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्यांत २,०८,४७२ गाठी कपास खपली. ऑक्टोबर, १९३७ मध्यें २,०६, ९६५ आणि सप्टेंबर, १९३८ मध्यें २, १७,६४८ गाठींचा उठाव झाला होता.

### बेलापूर कंपनीस ७½ लक्ष रुपये नफा

बेलापूर साखर कंपनीस ३० सप्टेंबर, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी ७,२२,८७१ रुपये नफा झाला. कंपनीची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं भागीदारांस १४% करमाफ डिव्हिडंड मंजूर झालें.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १३ आ. ६ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १३ आ. ६ पै इतका पडला.

### फ्रान्स आणि जर्मनी ह्यांमधील मित्रत्वाचा करार

फ्रान्स आणि जर्मनी ह्या दोन राष्ट्रांनीं एका युद्धविरोधी जाहीरनाम्यावर सही केली आहे. दोन्ही देशांस विभागणाऱ्या एकमेकांच्या सध्याच्या सरहद्दी त्या दोघांसहि मान्य असल्याचें त्यांत नमूद आहे.

### विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी अमेरिकेकडे धांव

युरोपांतील अनिश्चित परिस्थितीमुळें, विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी अमेरिकेंत सर्व देशांतून विद्यार्थिनी येऊं लागल्या आहेत.

### आंतरराष्ट्रीय पोस्टल परिषद

पंचवार्षिक आंतरराष्ट्रीय पोस्टल परिषदेचें अकरावें अधिवेशन ब्यूनॉस एरिस येथें एप्रिल, १९३९ मध्यें भरणार असून त्यांत सुमारें ८५० ठरावांवर चर्चा होईल आणि निर्णय केले जातील. १९३४ सालची परिषद कैरो येथें भरली होती.

### "नॅशनल सर्व्हिस हँडबुक"

राष्ट्रीय कार्याकरितां पुरुष आणि स्त्री नागरिकांचें सहकार्य जास्तींत जास्त प्रभावी व्हावें ह्यासाठी ब्रिटिश सरकारनें सूचनात्मक माहिती देणारें एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. पुस्तकाच्या २ कोटि प्रति छापून वांटण्यांत येतील.

### हिंदी समुद्रकिनाऱ्यावरील वहातुकींत ब्रिटिशांचा हिस्सा

हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावरील समुद्रांतून माल वहाण्याचा धंदा करणाऱ्या आगबोटींपैकी ९९,८०० टनांच्या आगबोटी हिंदी मालकीच्या असून ३,७६,५०० टनांच्या आगबोटी ब्रिटिश मालकीच्या आहेत, अशी माहिती सर एम्. झाफरुल्लाखान ह्यांनीं असेंब्लीमध्यें दिली.

### ज्यू लोकांची हकालपट्टी

पांच वर्षांचे अवधींत जर्मनींतील सर्व ज्यू लोकांचा नायनाट होईल, असा अजमास आहे.

### कपाशीची निर्गत

३१ ऑगस्ट, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी हिंदुस्थानांतून २१ लक्ष गाठी कपास निर्गत झाली. त्यापूर्वीच्या सालीं ४२ लक्ष गाठी निर्गत झाल्या होत्या.

### निर्गत व्यापाराचें राजकीय महत्त्व

"माल निर्गत करणाराचें काम राष्ट्रीय महत्त्वाचें आहे, कारण निर्गत व्यापारावर राष्ट्रीय उत्पादन आणि राजकारण अवलंबून आहे. राष्ट्राच्या ध्येयानुसार व्यापाऱ्यांनीं धोरण ठेवलें पाहिजे. सरकार आणि निर्गत करणारे व्यापारी ह्यांचेमध्यें विचारविनिमय आणि सहकार्य ह्यांची आवश्यकता आहे." वरील प्रकारच्या विचारसरणीनें जर्मनीच्या परराष्ट्रीय व्यापारास आतां चालना दिली जात आहे.

### गरीब लोकांसाठी घरें

म्हैसूर शहरांतील गरीब लोकांच्या सोईसाठी म्हैसूर इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बोर्डानें, १९३७-३८ मध्यें प्रत्येकी ५०० ते १,०५० रुपयांचीं ११९ घरें बांधलीं.

### ब्राह्मण उमेदवारांवरील निर्बंध दूर झाला

हिंदुस्थान सरकारच्या मुंबई प्रांतांतील पोस्ट आणि तार खात्यांत नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या, मराठी मातृभाषा असलेल्या प्रत्येक ब्राह्मण उमेदवारासंबंधीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट अगर कमिशनर ऑफ पोलीस ह्याजकडून तपशीलवार माहिती अधिकारी वर्ग मागवीत असे. १९१० सालापासून ह्या नियमाची अंमलबजावणी चालू होती, ती आतां थांबविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारनें हुकूम सोडला आहे.

### तारेच्या दरांत सवलत

१४ डिसेंबर, १९३८ ते ६ जानेवारी, १९३९ अखेर नाताळानिमित्त परदेशी पाठविण्यांत येणाऱ्या शुभचिंतक विद्युत्संदेशांस सवलतीचे दर आकारण्यांत येतील.

### आधी मागविलेल्या गव्हास जकातीची माफी

गव्हाच्या आयातीवर जकात बसविल्याच्या तारखेपूर्वी परदेशाकडून मागविलेल्या गव्हास सदरहू जकात माफ करण्यांत यावी, अशी दुरुस्ती बिलांत करण्याविषयीं इंडियन मर्चंट्स चेंबरनें हिंदुस्थान सरकारास तारेनें कळविलें आहे.

### स्थानिक स्वराज्य कारभार चौकशी कमिटी

मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासंबंधीं चौकशी करण्यासाठी प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यांत आलेल्या कमिटीनें आपली प्रश्नपत्रिका प्रसिद्ध केली आहे. १५ जानेवारीपूर्वी उत्तरें कमिटीस पोचलीं पाहिजेत.

### हिंदी विद्यार्थ्यांची ग्रेट ब्रिटनमध्यें रहाण्याची सोय

ग्रेट ब्रिटनमध्यें अभ्यासाकरितां जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची कुटुंबांतून रहाण्याची सोय करून देण्याकरितां कु. बोस ह्यांची एका वर्षाकरितां नेमणूक करण्यांत आली होती. त्यांच्या नोकरीची मुदत आतां मार्च, १९४१ अखेर वाढविण्यांत आली आहे.

### चांदीची निर्गत

शनिवार ता. १० रोजीं संपलेल्या आठवड्यांत मुंबई बंदरांतून ३,५३,८५६ औंस चांदी परदेशीं रवाना झाली.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २७-११-३८ ते ३-१२-३८ | निर्गत झाली नाहीं. |
| ४-१२-३८ ते १०-१२-३८ | १३,०५९ |
| २१-९-३१ ते १०-१२-३८ | ३,१७,५१,३७,८८६ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६०६ | ६ लाख ... ... | ६११ |
| २ फेडरल कोर्टाचा महत्त्वाचा निर्णय ... ... | ६०७ | ७ सहकारी चळवळ ... | ६१२ |
| ३ हिंदी व्यापाराचा आढावा | ६०८ | ८ पोलिस खात्याचा अहवाल | ६१३ |
| ४ कॉमनवेल्थ कंपनीची प्रगति ... ... | ६०८ | ९ जर्मन वसाहती ... | ६१३ |
| ५ स्फुट विचार | ६०९ | १० कॉमनवेल्थ कं.च्या सभा | ६१३ |
| इनकम टॅक्स बिल– ओटावा करार रद्द; पुढें काय !– फ्रान्स आणि जर्मनी यांची घोषणा– प्रांतिक उत्पन्नाचें नवें साधन–बिहार प्रांताचा सावकारी कायदा | | ११ तेलाच्या घाण्या | ६१३ |
| | | १२ इनकम टॅक्स बिलावर असेंब्लींत चर्चा ... | ६१४ |
| | | १३ हिन्दी आयुर्विम्याची प्रगति | ६१४ |
| | | १४ पुरंदर तालुका सहकारी परिषद् ... ... | ६१५ |
| | | १५ निवडक बाजारभाव | ६१६ |



# अर्थ

बुधवार, ता. १४ डिसेंबर, १९३८


## फेडरल कोर्टाचा महत्त्वाचा निर्णय

### विक्रीवरील कर "एक्साइज" नव्हे

हिंदुस्थानांत फेडरल स्वरूपाची घटना अमलांत येण्यापूर्वीच फेडरल न्यायमंदिराची स्थापना करण्यांत घटनाकारांचा उद्देश असा होता कीं प्रांतिक स्वायत्ततेचा उपभोग घेणारीं प्रांतांतलीं प्रधान मंडळें आणि मध्यवर्ती सरकार ह्यांचेमध्यें कर बसवण्याच्या अधिकाराबाबत उद्भवणाऱ्या वांध्यांचा निर्णय योग्य न्यायासनासमोर व्हावा. नवीन घटना कायद्यानें मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांचेमध्यें कर बसवण्याचे बाबतींत वांटणी केली असून तिच्या बाबतींत जरूर ते अधिकार निश्चित केले आहेत. आपणांस मिळालेल्या सत्तेचा अधिकांत अधिक उपयोग करून, विशेषतः आपल्या उत्पन्नाच्या बाबींचा विस्तार करण्याची इच्छा प्रांतिक सरकारांनीं बाळगावी आणि तिची पूर्तता करण्यास सध्याच्या आर्थिक मंदीच्या काळांत विशेष झटावें हें स्वाभाविक आहे. आपल्या राखीव सत्तेचें अतिक्रमण प्रांतिक सरकारांनीं करूं नये ह्याविषयीं मध्यवर्ती सरकारानें जागरूक असावें हेंहि तितकेंच सहाजिक आहे. मध्यवर्ती सरकार आणि स्वायत्त प्रांतिक सरकारें ह्यांच्यामध्यें वादाचे प्रश्न ह्या रीतीनें नेहमींच उद्भवतात आणि त्यांचा निकाल फेडरल न्यायमंदिरांतच व्हावा लागतो. हिंदी फेडरल कोर्टापुढें प्रांतिक सरकाराच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असा एक प्रश्न ह्या न्यायमंदिराच्या प्रारंभीच्या काळांतच आला आणि त्याचा निर्णय मध्यवर्ती सरकारास प्रतिकूल व प्रांतिक स्वायत्ततेस अनुकूल असा झाला हा विशेष योगायोगच म्हटला पाहिजे. आपणासमोरील वांध्याचें हें विशिष्ट स्वरूप लक्षांत घेऊन मुख्य न्यायाधीश, सर मॉरिस ग्वायर, ह्यांनीं फेडरल संघटनेंत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांमधील तंट्यांचा निर्णय कसा करणें आवश्यक असतें याचें स्थूल मानानें दिग्दर्शन केलें आणि त्याच्या मुळाशीं कोणतीं तत्त्वें असावीं लागतात ह्याचें विवेचन केलें.

हिंदुस्थान सरकारची तक्रार अशी होती कीं नवीन घटना कायद्यांत मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांनीं ज्यांचेविषयीं कायदे करावयाचे त्या बाबींच्या तपशीलवार जंत्र्या दिल्या आहेत, त्यांतील फेडरल यादींत ४५ नंबरची एक्साइजच्या करांची राखीव बाब असतां तिचें अतिक्रमण मध्यप्रांताच्या सरकारनें मोटार पेट्रोल व लुब्रिकेटिंग (वंगणाचें) तेल ह्यांच्या विक्रीवर बसवलेल्या कराचे योगानें झालें असल्यानें त्या संबंधांतला कायदा रद्द समजला जावा. त्याच्या उलट, प्रांतिक यादीमध्यें ४८ वी बाब आहे तींत मालाच्या विक्रीवर पट्टी बसवण्याचा हक्क प्रांतांस दिल्याचें स्पष्ट आहे, हा विरुद्ध बाजूचा मुख्य आधार होता. ह्या ४८ व्या बाबीप्रमाणें मध्यप्रांतीय सरकारनें तेलाच्या विक्रीवर पट्टी बसवण्याचा कायदा केला, तो हिंदुस्थान सरकारच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्या राखीव यादींतल्या ४५ व्या बाबीच्या कक्षेंत येत होता कीं काय ह्याचा निर्णय फेडरल कोर्टास करावयाचा होता. "एक्साइज" स्वरूपाचे कर बसवावयाचा आपला राखीव अधिकार असून मध्यप्रांतीय कायद्यानें त्याचें अतिक्रमण केलें आहे असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें असल्याकारणानें 'एक्साइज' कराची व्याख्या करणें फेडरल कोर्टास प्रथम आवश्यक झालें आणि मुख्य न्यायाधीशांनीं त्या व्याख्येचा सविस्तर विचार केला आहे, तो अत्यंत बोधप्रद आहे.

शब्दकोशांतला "एक्साइज" चा अर्थ असंदिग्ध नसला आणि त्या शब्दाचा उपयोग निरनिराळ्या स्थळीं भिन्नभिन्न रीतींनीं केलेला असला तरी हिंदुस्थानांत रूढ असलेला अर्थ, मालाच्या बनावटीवर, तो कारखान्यांतून बाहेर जातांना घेतलेला कर असाच आहे, ह्या मुद्यावर सर मॉरिस ह्यांनीं जोर दिला आहे. घटनेचा नवा कायदा करणारांच्या मनांत हा रूढ अर्थच असला पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. मालाच्या बनावटीवर हिंदुस्थान सरकारनें कर बसवावा आणि तो त्यांचा राखीव हक्क आहे, पण मालाची किरकोळ विक्री होत असतांना तिच्यावर कायद्याप्रमाणें प्रांतिक सरकारांसच कर बसवतां येतो अशी त्यांची विचारसरणी आहे. उलाढाल व विक्री होत असतां घेतलेला कर प्रांतिक सरकारांच्या अधिकारक्षेत्रांत येतो आणि त्यास हिंदुस्थान सरकारास हरकत घेतां येत नाहीं असा त्यांचा निर्णय आहे. हिंदुस्थान सरकारनें सुचवलेला अर्थ मान्य केल्यास प्रांतिक सरकारांस दिलेल्या हक्कावर गदा येऊन त्यांच्या उत्पन्नाचें एक महत्त्वाचें साधन हिरावून घेतल्यासारखें होतें आणि असें होऊं देण्याची कल्पना घटना कायदा करणाऱ्या पार्लमेंटच्या डोक्यांत असणें शक्य नाहीं असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

फेडरल कोर्टाचा प्रस्तुत निर्णय फेडरल कोर्टानें एकमतानें दिला आहे. त्याचे परिणाम दीर्घगामी होतील ह्यांत शंका नाहीं. मध्यवर्ती सरकार एका बाजूस आणि प्रांतिक सरकारें दुसऱ्या बाजूस अशीच परिस्थिति त्यांत नसून करांच्या बाबतींतले प्रांताप्रांताचे परस्पर संबंधहि त्यानें बाधित होण्यासारखे आहेत. हिंदुस्थानांत बनवला जाणारा विशिष्ट माल आपण उदाहरणादाखल घेऊं. त्याच्या बनावटीवर "एक्साइज" कर घेण्याचा मध्यवर्ती सरकारचा हक्क निर्विवाद आहे आणि तो प्रांतिक सरकारांच्या हद्दींत बसवला जाईल. परंतु अगदीं थोड्या जातींच्या मालावरच हा कर बसवणें त्या सरकारास व्यावहारिक दृष्ट्या शक्य असल्यानें ह्या उदाहरणांतील मालावर तो त्यांनीं बसवला नाहीं असें आपण समजूं. त्याच बरोबर एखाद्या प्रांतिक सरकारानें त्या मालाच्या

विक्रीवर ( बनावटीवर नव्हे ) स्वतःच्या हद्दींत, त्यास निर्विवाद असलेल्या अधिकारान्वयें, कर बसवल्यास मध्यवर्ती सरकारास त्याच मालावर उत्पादन-कर पुन्हा बसवणें कठीण होईल, एवढेंच नव्हे तर विशिष्ठ पदार्थावर एका प्रांतांत कर आहे आणि दुसऱ्या प्रांतांत नाहीं असें होऊन प्रस्तुत प्रांताबाहेरील त्याच्या उत्पादकांच्या हितसंबंधाविषयीं विषमता व अन्याय उत्पन्न होईल अशीहि तक्रार हिंदुस्थान सरकारनें केली असून ही गोष्ट घटनाकायद्याच्या २९७ ( १ ) व ह्या कलमाखाली निषिद्ध आहे असें त्यानें म्हटलें आहे. मालाच्या विक्रीवर कर बसवण्याचा प्रांतिक सरकारांचा अधिकार सिद्ध आहे असें ठरवल्यावर ह्या शेवटच्या तक्रारीचा विचार करण्यार्चे तादृश प्रयोजन नाहीं असें मुख्य न्यायाधीशांनीं म्हटलें आहे. तथापि फेडरल कोर्टाचा प्रस्तुत प्रकरणांतला निर्णय किती महत्त्वाचा आहे आणि हिंदुस्थान सरकारनें उपस्थित केलेला प्रश्न किती दीर्घपरिणामी स्वरूपाचा आहे ह्याची त्यावरून सहज कल्पना येईल.

## हिंदी व्यापाराचा आढावा

### ( १९३७-३८ )

हिंदुस्थानाच्या व्यापारासंबंधीं १९३७-३८ सालविषयक अहवाल हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक सल्लागारानें प्रसिद्ध केला आहे, त्यावरून हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराची असमाधानकारक परिस्थिति स्पष्टपणें नजरेस येते. ह्या वर्षी हिंदुस्थानानें १८१ कोटि रुपये किंमतीच्या मालाची निर्गत केली. हा आकडा १९३६-३७ मधील निर्गतीच्या किंमतीच्या आकड्यापेक्षा ४ कोटींनीं लहान आहे. आयातीमध्यें मात्र विलक्षण वाढ झाली. हिंदुस्थानानें अहवालाचे वर्षी त्यापूर्वीच्या सालापेक्षां ३२ कोटि रुपये अधिक किंमतीचा माल परदेशांतून मागवला. मालाच्या आयात-निर्गतीमधील अनुकूल तफावत १९३६–३७ मध्यें ५२ कोटि रुपये होती ती १९३७–३८ मध्यें फक्त १६ कोटि रुपयेच राहिली. सोन्याचांदीची आयात-निर्गत हिशेबांत घेतली असतां ह्या अनुकूल तफावतीची रकम खाली दिल्या प्रमाणें आहेः—

| वर्ष | अनुकूल तफावत ( रु. ) |
|---|---|
| १९३५–३६ | ४० कोटि |
| १९३६–३७ | ६५ कोटि |
| १९३७–३८ | ३०½ कोटि |

ह्या परिस्थितीचा परिणाम परराष्ट्रीय हुंडणावळीवर होणें अपरिहार्य होतें.

१९२९ सालीं आर्थिक मंदीस प्रारंभ झाला आणि हिंदी शेतकऱ्यांचे हाल सुरू झाले. १९३२–३३ मध्यें बाजारभाव सुधारूं लागले, परंतु शेतीच्या मालाची किंमत अतिशय मंद गतीनें वाढत होती. १९३६ सालीं शेतीच्या मालाचे बाजारभावांत खरी सुधारणा दिसूं लागली. १९३७ च्या प्रारंभीं युद्धसंभवामुळें कच्च्या मालास आणि पक्क्या मालास मागणी वाढली आणि एप्रिल, १९३७ मध्यें किंमतीची कमान सर्वांत वर पोचली. त्यानंतर सुमारें नोव्हेंबरपर्यंत बाजारभाव उतरत गेले, ते पुनः सुधारले. जून, १९३८ मध्यें ते पुनरपि खाली गेले. परंतु तेव्हांपासून औद्योगिक उत्पादन आणि मालाची किंमत ह्यांत वाढ होत राहिली आहे.

अमेरिकेंतील कपाशीचें प्रचंड पीक आणि त्याचप्रमाणें कपाशीच्या जागतिक उत्पादनांत वाढ, ही आपत्ति मंदीच्या काळांतच आल्यामुळें १९३७–३८ मध्यें कपाशीच्या बाजारभावांत मोठी घट झाली. कपाशीच्या उठावांत मात्र वाढ झाली नाहीं. हिंदी तागाचें उत्पादन वाढलें परंतु त्यास चांगली मागणी आली. गळिताच्या धान्यांस मंदीची झळ लागली. भुइमूग आणि जवस ह्यांस येतें वर्ष बरें जाईल, अशी अपेक्षा अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे. हिंदी गव्हाचे बाजारभावांत सुधारणा घडून आलेली आढळली.

सन १९३७–३८ च्या प्रारंभीं मंडळयांच्या भागांचे किंमतींत भयंकर चढ–उतार घडून आलेला दिसला. चलंती: येणार ह्या अपेक्षेनें सट्टेबाजीस ऊत आला, तथापि लवकरच परिस्थिति निवळली. ऑर्डिनरी भागांची किंमत मार्च, १९३७ मध्यें सर्वांत वर गेली ती जूनमध्यें उतरून ऑक्टोबरमध्यें पुनः चढली आणि तेव्हांपासून किंमतींत वाढ झाली नाहीं. लोखंड आणि पोलाद ह्यांच्या बाजारभावांत नोव्हेंबर, १९३७ च्या सुमारास ७० टक्के वाढ झाली आणि कोळशाची किंमत ह्याहिपेक्षा अधिक प्रमाणांत वाढली. जून, १९३७ नंतर साखरेचे बाजारभावहि सुधारले. कपास–कापडाची किंमत मात्र गेलीं-तीन चार वर्षें संथ राहिली आहे. हिंदुस्थानाच्या अंतर्गत व्यापारांत समाधानकारक रीतीनें वाढ होत आहे.

### स्कोडाचे कारखाने

झेकोस्लोव्हेकियांतील सुप्रसिद्ध स्कोडा कंपनीच्या कारखान्यांच्या मालाचा स्वदेशांत पूर्वीसारखा खप होणें ह्यापुढें अशक्य आहे. युद्धसामुग्रीच्या उत्पादनाचे बाबतींत ह्या कारखान्यांनीं मिळविलेलें यश सुप्रसिद्ध आहे. इतर देशांस आतां स्कोडा कंपनीकडून आपली युद्धसामुग्री बनवून घेतां येईल.

### कॉमनवेल्थ विमा कं. ची प्रगति

| वर्ष | विम्यासाठी अर्ज(रु.) | पॉलिसी दिल्या (रु.) | हप्त्यांचें उत्पन्न (रु.) | विमाखातीं फंड (रु.) | खर्चाचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| पहिलें | ११,५९,२५० | ७,०४,२५० | २७,२६४ | ४४२ | ८६% |
| तिसरें | १३,०४,००० | १०,५३,७५० | १,१४,३९७ | ६२,३९७ | ५०% |
| पांचवें | २३,०२,७५० | १८,२७,२५० | २,२१,४०१ | २,२९,३४४ | ४६·७% |
| सातवें | ३३,१५,५०० | २८,१६,००० | ४,०४,५४१ | ५,३६,३९५ | ४४·०१% |
| आठवें | ४१,४८,१०२ | ३२,२३,७५० | ५,०९,२३१ | ८,०८,४७३ | ४१·६५% |
| नववें | ५०,१८,५४२-८ | ४०,३९,७७३-८ | ६,३४,६७१ | ११,८९,५७६ | ३९·१७% |

# स्फुट विचार

### इनकम टॅक्स बिल

इनकम टॅक्स बिलाचीं तिन्हीं वाचनें असेंब्लींत आतां पुरीं झालीं असून असेंब्लीचें अधिवेशन समाप्त झालें आहे. अशा रीतीनें, आज कित्येक दिवस चर्चिल्या जात असलेल्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागला आहे. इनकम टॅक्स बिलानें घडवून आणलेल्या दुरुस्त्यांमुळें सरकारच्या उत्पन्नांत सुधारणा होईल, आणि त्याचबरोबर कर भरणाऱ्या लोकांवरहि न्याय्य आकारणी होईल, असें मत श्री. भुलाभाई देसाई ह्यांनीं व्यक्त केलें, तें उद्बोधक आहे. बिलाच्या ४ थ्या आणि ४९ व्या कलमांतील योजनांवर सरकार आणि विरोधी पक्ष ह्यांचेमध्यें तीव्र मतभेद होता; तथापि दोघांनींहि सामोपचारपणानें तडजोड घडवून आणली, हें उभयपक्षास भूषणावह आहे. ४ थ्या कलमांतील कराचे आकारणीच्या योजनेमुळें युरोपियनांस सवलत मिळत होती, ती नाकारण्यांत युरोपियन प्रतिनिधींनीं मुत्सद्देगिरी दाखविली, ह्यांत संशय नाहीं. सरकार आणि विरोधी पक्ष ह्यांमधील मतभेदामुळें सबंद बिलच गारद होण्याची भीति मध्यंतरीं उपस्थित झाली होती, ती श्री. भुलाभाई ह्यांच्या प्रयत्नांमुळें टळली. सरकारविरोधी काँग्रेस पक्षानें जेवढें मिळेल तेवढें पदरांत पाडून घेऊन आणि नाइलाज तेथें तडजोड स्वीकारून जबाबदारीची वृत्ती दर्शविली, ती विशेष उल्लेखनीय आहे.

### ओटावा करार रद्द झाला, पुढें काय ?

एप्रिल, १९३९ पासून ओटावा करार रद्द होणार, असें सरकारतर्फे असेंब्लींत जाहीर करण्यांत आलें आहे. ओटावा करार संपुष्टात आणण्याविषयीं असेंब्लीनें मागेंच ठराव केला होता. तथापि, हिंद–ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी चालू होत्या त्यांतून कांहीं तडजोड निष्पन्न होऊन हिंद–ब्रिटन व्यापाराची घडी नीट बसवितां येईल अशी सरकारास आशा वाटत होती. हिंदुस्थान आणि ग्रेटब्रिटन ह्यांमधील विचार-विनिमयांत ब्रिटिश कपास कापडाची हिंदुस्थानांत किती आयात होऊं द्यावी आणि ग्रेट ब्रिटननें हिन्दी कपास किती खरेदी करावी, हे प्रश्न महत्त्वाचे होते. प्रदीर्घ काळाच्या वाटाघाटींनंतरहि त्या संबंधांत हिन्दी सल्लागार मंडळ आणि ब्रिटिश प्रतिनिधी ह्यांमध्यें तडजोड होऊं शकली नाहीं आणि ग्रेटब्रिटननें त्या देशांतील कपाशीच्या उठावाबाबत इतर देशांशीं स्वतंत्र करार करण्यास प्रारंभहि केला. ३१ मार्च नंतर कापडाच्या आयातीवर कोणत्या दरानें जकात बसवावी, हा महत्त्वाचा प्रश्न आतां उपस्थित झाला आहे. त्या तारखेपूर्वी टारिफ बोर्डामार्फत हिन्दी कापडाच्या धंद्याची चौकशी करण्यास पुरेसा वेळ मिळणार नाहीं आणि सरकारास ह्या संबंधांतील आपला निर्णय पुनः पुढें ढकलावा लागेल, असा रंग दिसतो.

### फ्रान्स आणि जर्मनी ह्यांची संयुक्त घोषणा

जर्मनी आणि फ्रान्स ह्या दोन देशांनीं एका सलोख्याच्या करारावर नुकतीच सही केली आहे. ह्या दोन देशांतील सलोख्यावर युरोपांतील शांतता बव्हंशीं अवलंबून आहे; ह्या दोहोंमधील सरहद्द दोघांसहि मान्य आहे; फ्रान्स आणि जर्मनी ह्या दोन देशांच्या हितसंबंधाविषयीं प्रश्नांचेबाबत एकमेकांचा सल्ला घेण्याचा त्यांचा निश्चय आहे, इत्यादि कलमें वरील जाहीरनाम्यांत अंतर्भूत आहेत. व्हर्सेइच्या तहानें फ्रान्सला युरोपियन राजकारणांत पहिल्या प्रतीचें स्थान प्राप्त झालें होतें तें हळु हळु खाली जात गेलें आणि आतां प्रस्तुत जाहीरनाम्यानें त्यास जर्मनीच्या बरोबरीच्या दर्जावर आणलें आहे. जर्मनीचें महत्त्व दिवसानुदिवस वाढत आहे आणि पूर्व युरोपांतील देशांवर आपली छाप बसवून तो त्यांस आपल्या कक्षेंत आणीत आहे. गमावलेल्या वसाहती परत मिळविण्याचें सामर्थ्य आज जर्मनीचे अंगीं नाहीं; तथापि युरोपांत वर्चस्व कमावण्याच्या त्याच्या कार्यक्रमास त्यास यश येत आहे. करार आणि जाहीरनामे ह्यांच्या पावित्र्याची किंमत आतां जवळ जवळ नाहींशी झालेली आहे आणि विशेषतः जर्मनीनें त्यांचा फोलपणा अनेकवार दाखवून दिलेला आहे. प्रस्तुत जर्मन-फ्रेंच करारामुळें त्या दोघांतील युद्धसंभव दूर झाला अगर नाहींसा झाला असें कोणीच मानीत नाहीं; शत्रुत्वाच्या घोषणेपेक्षा अगर तटस्थपणापेक्षा सलोख्याची घोषणा अधिक श्रेयस्कर, इतकाच त्याचा अर्थ आहे.

### प्रांतिक उत्पन्नाचें नवें साधन सांपडलें

प्रांतिक प्रधानमंडळांस आपल्या नियोजित कार्यक्रमास मूर्त स्वरूप देण्याचे मार्गांत पैशाची मुख्य अडचण भासत असून उत्पन्नाच्या नव्या बाबी हुडकून काढण्यांत त्यांतले अर्थमंत्री गुंतले आहेत. मध्यप्रांतांतील पेट्रोल कराचे बाबतींत फेडरल कोर्टानें अनुकूल निर्णय दिला आहे, त्याचे योगानें उत्पन्न वाढवण्याचें नवें साधन त्यांस गवसल्यासारखे झालें आहे. तथापि, वाटेल त्या मालाच्या विक्रीवर वाटेल तेथें कर बसवणें त्यांस व्यवहार्य आणि इष्ट होईल असें मात्र समजून चालतां येणार नाहीं. करांचे दृश्य आणि अदृश्य परिणाम असे कांहीं होत असतात कीं त्यांचे योगानें अपेक्षेपेक्षा निराळयाच गोष्टी घडून येतात आणि भलत्याच वर्गांवर व धंद्यांवर त्यांचा बोजा शेवटीं पडतो. ह्या कारणानें मालाच्या विक्रीवर बसवावयाच्या करांची योजना विचारपूर्वक करावी लागते आणि करास पात्र व्हावयाच्या मालाची निवड दूरदृष्टीनें करणें आवश्यक असतें. फेडरल कोर्टाच्या निर्णयामुळें हिंदुस्थान सरकारची तक्रार अमान्य ठरली असली तरी तिच्यासंबंधांतील कांहीं बाबी केवळ काल्पनिक आहेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या प्रकारच्या करांविषयीं भानगडीचे आणि गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होऊन त्यांचे परिणाम हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्या सर्वांस जाचक होण्याचा संभव आहे. ह्यासाठी त्यांच्या अर्थमंत्र्यांची परिषद् बोलावून तीमध्यें सर्वसाधारण व सर्वमान्य असें धोरण आखण्याविषयींची सूचना पुढें आली आहे, ती सर्वथैव योग्य आहे. प्रत्येक प्रांत मालविक्रीच्या कराचे बाबतींत आपापल्या मार्गानें जाऊं लागला आणि हिंदुस्थान सरकार आपल्या स्वतःपुरतें पाहूं लागलें तर ती गोष्ट अनर्थावह होईल. म्हणून, त्यांचे धोरणांत एकसूत्रीपणा येऊन सर्वांच्या हितसंबंधाचें उचित असें संरक्षण होईल तर ती गोष्ट अत्यंत इष्ट समजली पाहिजे.

### बिहार प्रांताचा सावकारी कायदा गैरलागू ठरला

मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांच्या अधिकारक्षेत्रांत येणाऱ्या परस्पर विरोधाविषयीं एक निर्णय फेडरल कोर्टानें दिला आहे, त्याचें विवेचन आम्हीं आज दुसरीकडे केलें आहे. ह्याच स्वरूपाचा एक प्रश्न बिहारच्या प्रांतिक विधिमंडळानें पास

केलेल्या सावकारी कायद्याच्या संबंधांत उपस्थित झाला आहे मध्यवर्ती विधिमंडळानें केलेल्या कायद्यामधील कलमें विफल करणारा कायदा प्रांतिक विधिमंडळानें केल्यास तो गैरलागू होतो हें उघड आहे. ह्या दोहोंमध्यें सरोसर विरोध आहे कीं काय याचा निर्णय बिहारपुरता प्रांतिक हायकोर्टानें दिला आहे. त्याचा अखेरचा निकाल फेडरल कोर्टाकडून लावून घेणें शक्य आणि संभवनीय आहे. तूर्त तरी पाटणा हायकोर्टानें दिलेला निकाल बिहार प्रांतांत अधिकृत आणि अखेरचा असा झाला असून केलेल्या कायद्यांतलें मुख्य कलम रद्द झाल्याकारणानें तेथील सरकारास नवा कायदा करून आपला मूळ उद्देश अन्य रीतीनें पूर्ण कायदेशीर रीतीनें साध्य करून घ्यावा लागेल. गैरलागू करण्यांत आलेल्या बिहारमधील सावकारी कायद्याचें कलम असें आहे कीं, कोणत्याहि कर्जावरील व्याजाची रकम मूळ मुद्दलाइतकी झाली असल्यास कोर्टानें ह्यापेक्षा अधिक रकम सावकारास देववूं नये. हा दामदुपटीचा प्रसिद्ध नियम होय. मध्यवर्ती सरकारानें कराराचा कायदा, ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट,इत्यादि कायदे केले आहेत, त्यांमध्यें व्याजाबद्दल कोर्टास निर्णय-स्वातंत्र्य दिलें आहे, तें बिहारमधील सावकारी कायद्याच्या ११ व्या कलमानें काढून घेतल्यासारखें होतें. ह्या मुद्यावर पाटणा हायकोर्टानें आपला निकाल दिला आहे त्यावर फेडरल कोर्टाकडे अपील होण्याचा संभव आहे. बहार प्रांताच्या सरकारास हा निर्णय ध्यानांत घेऊन व आलेल्या अडचणी टाळून नवा कायदा करावा लागेल आणि आक्षेपित कायदा रद्द करावा लागेल. नव्या बिलास गव्हर्नर जनरलची परवानगी रीतसर घ्यावी लागेल हें उघड आहे. कर्जदाराचा बोजा हलका करणें हा प्रांतिक सरकाराचा स्तुत्य उद्देश असला तरी त्यासंबंधांत करावयाचा कायदा मध्यवर्ती कायदेमंडळाच्या कक्षेमधील कायद्यांशीं विसंगत असतां कामा नये ही गोष्ट प्रस्तुत प्रकरणावरून स्पष्ट झाली आहे.

---

### गव्हाच्या आयातीवर जकात

हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या गव्हावर आणि कणकेवर प्रत्येक हंड्रेडवेटास १½ रुपया ह्या दरानें जकात बसविण्यांत आली आहे. आयात गहूं अत्यंत स्वस्त विकला जातो आणि त्यामुळें हिंदी गव्हाचा खप होऊं शकत नाहीं. बंदरांत उतरणाऱ्या विदेशी गव्हावरील संरक्षणाच्या सहाय्यानें हिन्दी गव्हास स्पर्धा करतां येईल अशी अपेक्षा आहे. ही जकात ७ डिसेंबर रोजीं बसविण्यांत आली आणि त्याबाबतचें बिल असेंब्लीस सादर करण्यांत आलें, तें यथाक्रम पास होईलच. ३१ मार्च, १९४० अखेर हा जकातीचा दर अंमलांत राहील.

---

### महाराष्ट्रांतील साखर कारखाने

"सरकारनें साखर कारखान्यांबाबत निश्चित, सहानुभूतीचें आणि प्रगतिपर असें धोरण ठेवल्यास महाराष्ट्रांतील दुष्काळी भागास चांगले दिवस दिसल्याखेरीज रहाणार नाहींत. साखरकारखान्यांच्या एकूण उत्पन्नापैकी शेकडा सुमारें २९ इतकें उत्पन्न मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांच्या वाट्यास जातें. म्हणजे, साखरेच्या धंद्यांत सरकार हें भागीदार आहे, असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं.":—बेलापूर कंपनी लि.चे अध्यक्ष,सर जोसेफ के, ह्यांचें कंपनीच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं झालेलें अध्यक्षीय भाषण.


## दि प्रॉव्हिन्शिअल बँक
### ऑफ अिण्डिया लिमिटेड
**स्थापना १९३६**

मुख्य कार्यालय:२२/अ, हॉस्पिटल रोड (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: **अेस्. पी. ठाकर.**

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्:** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्:** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळां पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी:** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्या संबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

**एम्. मोहन, एजंट,** १७ मेनस्ट्रीट, पुणें.

**एच. जी. गद्रे, एजंट** लक्ष्मीरोड, पुणें. २

## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

**जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.**

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. मॅनेजिंग डायरेक्टर

## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा
**मोती चौक : : : सातारा**

## लाख

स्वतःच्या संरक्षणासाठी वेष्टन करण्याकरितां लाखेचा किडा जें द्रव्य शरीरांतून बाहेर टाकतो, तीच लाख होय. झाडांचे फांद्यांवर हे किडे वाढतात. एका चौरस इंच जागेंत १५० ते २०० किडे मावतात. हे किडे झाडाच्या सालींतून आंत तोंड खुपसून आंतील रसावर आपली उपजीविका करतात. किड्यांचे शरीरावर लाखेचें वेष्टन पडतें. अशा १½ लक्ष किड्यांचे वेष्टनापासून एक पौंड लाख तयार होते. कुसुम, बोर, बेल आणि पळस ह्या झाडांवर लाखेच्या किड्यांची वाढ उत्कृष्ट होते. झाडांवरील लाख गोळा करण्याच्या मोसमानुसार लाखेच्या पिकास कार्तिकी ( ऑक्टोबर-नोव्हेंबर ), वैशाखी ( एप्रिल-मे ), कुसमी ( डिसेंबर-जानेवारी ) आणि जेष्ठी ( जून-जुलै ) अशीं नांवें आहेत.

लाखेचें उत्पादन युरोपच्या बाहेर बाकीच्या सर्व देशांत होत असलें तरी हिंदुस्थानाइतके इतर कोणत्याच देशांत तें होत नाहीं. छोटा नागपूर, ओरिसामधील हिंदी संस्थानें, मध्यप्रांत, बिहार, इत्यादि ठिकाणीं लाखेचें उत्पादन सर्वांत ज्यास्त होतें. हिंदुस्थान देश वगळयास, लाख उत्पादन करणारे ब्रह्मदेश आणि सयाम हे दोनच देश महत्वाचे आहेत आणि त्यांतील उत्पादन जागतिक उत्पादनाच्या शेकडा ५ टक्के इतकें आहे.

### हिंदुस्थानांतील वार्षिक उत्पादन

| | मण* |
|---|---|
| बिहार | ७,१६,००० |
| मध्यप्रांत | १,६०,००० |
| बंगाल | ८०,००० |
| ब्रह्मदेश | ५२,००० |
| आसाम | ३७,००० |
| मध्यप्रांत | ३६,००० |
| पंजाब | १०,००० |
| मुंबई—बडोदें | ९,००० |
| एकूण ( सुमारें ) | ११,१६,७०० |

हिंदी शेतकरी लाखेची लागवड दुय्यम धंदा म्हणून करतात. हें काम मोसमामध्यें, कांहीं ठराविक दिवसच, करावें लागतें. ज्या झाडांवर लाखेचे किडे बसतात, तीं झाडें शेतकऱ्याच्या मालकीचीं नसल्यास, उत्पन्नाच्या निम्मा हिस्सा खंड म्हणून जमीनदार घेतो. लाखेच्या किड्यांस शत्रू असतात आणि किडे ज्या झाडांवर वाढतात त्या झाडांसहि आपल्या शत्रूंपासून बचाव करावा लागतो.

१०० वर्षांपूर्वी लाखेस तिच्या रंगामुळें महत्व प्राप्त झालें होतें. आतां कृत्रिम रंगाच्या उत्पादनामुळें लाखेच्या रंगाचें महत्त्व, निळीप्रमाणेंच, नाहींसें झालें आहे. लाखेच्या रेझीनला मात्र वाढती मागणी आहे. हा पदार्थ अल्कोहोलमध्यें विरघळतो, पेट्रोलमध्यें विरघळत नाहीं, आणि त्यास वितळण्यास उष्णतामान भारी लागत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीपर्यंत, लाखेच्या रेझीनचा ग्रामाफानच्या तबकड्यांसाठी फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असे आणि अजूनहि तसा तो होतो. तथापि, इतर धंद्यांतील त्याचे उपयोग विशेष महत्त्वाचे आहेत. अर्थात्, कृत्रिम रेझिन्सचें उत्पादन झपाट्यानें वाढत असून त्यांची स्पर्धा स्वाभाविक रेझिन्सना घातक होऊं लागली आहे. लाखेच्या धंद्यासंबंधीं हिंदुस्थानांत आणि अमेरिकेंत संशोधन चालू आहे.

*१ मण=२५ते८५ पौंड, निरनिराळया ठिकाणच्या वजनाप्रमाणें.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरक्टर.

## नांदगांव-येवला तालुका को. सुपरवायझिंग यूनियन, लिमिटेड

शेतकऱ्यांच्या पडत्या परिस्थितीमुळें मालाचे उतरते भाव व को. के. सोसायट्यांतील कर्जदार मेंबरांची खालावलेली स्थिति याचा सर्व दृष्टीनें विचार करून मेंबरांना व्याजांत व्यक्तिशः सूट मिळावी अशा हेतूनें खात्यानें पुन्हां ही सवलत या वर्षीहि चालू ठेविली आहे. या योजनेची जाणीव सर्वांना व्हावी व त्यास अनुसरून वसुलासहि प्रोत्साहन मिळावें याकरितां नांदगांव तालुक्यांतील सर्व ग्रुप सेक्रेटरी, सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, व श्री. वाय. एस. घोगळे, स्पेशल रिकव्हरी ऑफिसर मालेगांव या सर्वांनीं एकत्रित दौरा काढून सोसायट्यांना भेटी देऊन व्यक्तिशः व्याजाचे सवलतीची जाणीव सोसायट्यांतील सभासदांना करून दिली व त्याप्रमाणें वसूल देण्याची व सवलतीचा फायदा घेण्याची सभासदांनीं अभिवचनेंहि दिलीं आहेत.

नोव्हेंबरच्या वरील दौऱ्यामध्यें स्पेशल रिकव्हरी ऑफिसर यांनीं बजावणीचें काम कसोशीनें करून लवादी मेंबरांच्या वसुलीसाठी चिकाटीचा प्रयत्न केला. त्यामुळें तालुक्यांतील सर्व सोसायट्यांत खळबळ उडून गेली. त्याचा असा परिणाम झाला कीं सोसायटीचा वसूल न देण्याची जी लोकांची भ्रामक समजूत होती ती आपोआप अजिबात नाहींशी होऊन प्रत्येकजण आपल्या कर्जाची फेड कशी होईल याचाही विचार करूं लागला आहे. इतकेच नव्हे तर आतां सोसायटींच्या कर्जाची फेड केल्याशिवाय आपली पत टिकाऊ होणार नाहीं अशी लोकांची दृढ समजूत झालेली आहे. या विचाराची सभासद आस्थापूर्वक कळकळ बाळगतील तर ते स्वतः कर्जफेडींतून मोकळे होतील व सोसायट्या सुधारून जरूर त्या सवलतींचा फायदा घेण्यास पात्र होतील अशी उमेद आहे.

या महिन्यांत ज्या ज्या ठिकाणीं स्पेशल रिकव्हरी ऑफिसर यांनीं बजावणीचीं कामें केलीं त्या त्या सोसायट्यांना सुपरवायझर व इन्स्पेक्टर यांनीं लगेच लागोपाठ भेटी देऊन वसुलाची जागृती कायम टिकवण्याची खबरदारी घेतली आहे. नांदगांव तालुक्यांतील नोव्हेंबर महिन्यांतील वसूल लवादी मेंबरांचा रु. २२७३ व एकूण वसूल रु. २९८२ झाला आहे.

चालू सालीं प्रथम पाऊस पडल्यानें कपाशीची लागण पुष्कळ प्रमाणांत झाली व या उत्पन्नावर यंदा यशदायक प्रगति होईल अशी खात्री वाटत होती. पण मागाहून जास्त पाऊस झाल्यानें पिकांची नासाडी झाली आहे. असें जरी आहे तरी पण वसुलीबाबत व सोसायट्या सुधारण्याबाबत शक्य ते कसोशीचे प्रयत्न यूनीअन व बँक करीत आहे.

### मुंबई प्रॉ. को. बँक लि. शाखा नांदगांव (जि. नाशिक)

वरील शाखेनें यंदापासून व्यापाऱ्यांच्या हुंड्या, रेल्वे रसिदी, वगैरे स्वीकारून व्यवहार करण्यास प्रारंभ केला आहे. त्याचप्रमाणें नांदगांव येथील स्थाईक व्यापाऱ्यांस मालाचे तारणावर पैसे पुरविण्याचेंहि काम चालू आहे.

### वाळवे तालुका नामदेव को. के. सोसायटी लि.

वरील सोसायटीची वार्षिक साधारण सभा ता. २२-१२-३८ रोजीं ७ वाजतां इसलामपूर येथें भरणार आहे.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना—७ सप्टेंबर १९०६]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,०५,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**शाखा**—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रे (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), कुलाबा (मुंबई), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर (किंग्जवे), जमशेदपूर

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल....... | रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल....... | रु. | २,४४,६०० |
| वसूल झालेलें भांडवल... | रु. | १,२२,३०० |

### शाखा

अॅक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.

## मुंबई प्रांताच्या पोलिस खात्याचा अहवाल

### उपनगरांतील वाढती वस्ती आणि पोलिसांचा तुटवडा

"मुंबई इलाख्यांत, १९३७ सालीं, पोलिस खात्याकडे एकूण १,५२,८१५ गुन्ह्यांची नोंद झाली. हा आकडा १९३६ च्या तत्सम आकड्यापेक्षा ९,८९० नीं मोठा आहे. गुन्ह्यांच्या सवरींत वाढ होण्याचीं प्रमुख कारणें म्हणजे नोंदणीचेबाबत घेण्यांत येणारी विशेष दक्षता, आर्थिक दुःस्थिति आणि पोलिस खात्याशी जनतेचें वाढतें सहकार्य, हीं होत. अहमदाबाद, मुंबई आणि पुणें ह्यांच्या उपनगरांचा विस्तार गुन्ह्यांची संख्या तेथें फुगण्यास कारणीभूत झाला आहे, तथापि त्या विभागांतील पोलिसांची संख्या त्या मानानें वाढलेली नाहीं. सबंद मुंबई प्रांतांत अहवालाचे वर्षी ४०७ खुनांची, १३८ खुनाच्या प्रयत्नांची आणि ५,०७३ चोऱ्यांची पोलिसांस खबर मिळाली. १६,३६२ खटले कोर्टांत भरण्यांत आले, त्यांपैकी १५,४३५ खटल्यांत आरोपींवर गुन्हा शाबीत झाला. अहवालाचे सालीं पोलिसांनीं एकूण २८,८८९ लोकांस अटक केली. डेप्युटी सुपरिंटेंडंट ऑफ पोलिसच्या खालच्या दर्जाचे ७२७ अधिकारी आणि १७,४८८ शिपाई पोलिस खात्यांत आहेत. सबंद खात्याचा खर्च १९३७ सालीं ९८ लक्ष, ३५ हजार रुपये झाला. दर पोलिस शिपायामागणिक खर्चाचें प्रमाण ५१४ रु. ५ आ. १ पै इतकें आलें आणि ४½ चौरस मैलांस एक पोलिस, असा हिशेब पडला."

---

### महायुद्धापूर्वीच्या जर्मन वसाहती

महायुद्धापूर्वीच्या आपल्या वसाहती आपणांस परत मिळाव्यात अशी जर्मनीची मागणी आहे. खालील तक्त्यांत जर्मन वसाहतींसंबंधीं माहिती दिली आहे:—

| | युरोपियन वस्ती | तद्देशीय वस्ती (हजार) | निर्गतीची किंमत (लक्ष रुपये) |
|---|---|---|---|
| पूर्व आफ्रिका | ९,४०० | ८५,०० | ६५० |
| दक्षिण आफ्रिका | ३०,७०० | ३,०० | ३९० |
| कॅमेरून्स | २,७०० | ३२,०० | ३२५ |
| टोगो | ४०० | ११,०० | ९७ |
| न्यू गयायना | ३,८०० | ५,०० | २६० |
| नौरू | २०० | २ | ६५ |
| प. सामोआ | ६०० | ५५ | ३२ |
| मॅरिॲनी बेटें | १०० | ५० | १३० |

---

### दारूच्या जाहिरातींवर नियंत्रण

दारूच्या जाहिरातींवर नियंत्रण घालणारें एक बिल मुंबई सरकार प्रांतिक विधिमंडळापुढें मांडणार आहे. मद्रास सरकारनें ह्याबाबत केलेल्या योजनेस अनुसरूनच मुंबई सरकार कायदा करणार आहे.

---

### पचनास हलकीं अन्नें हिंदुस्थानांत तयार होणार

लहान मुलें आणि अशक्त स्त्री-पुरुष ह्यांच्या अन्नाचे पेटंट डबे हिंदुस्थानांत दरसाल येतात, त्यांची किंमत १६ लक्ष रुपयांवर भरते. जवारीपासून हे पदार्थ हिंदुस्थानांतच बनविल्यास एवढ्या रकमेची प्रतिवर्षी बचत होईल. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे ह्याबाबत प्रयोग चालू आहेत.

### कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या सभा

कॉमनवेल्थ विमा कंपनीची नवीन वार्षिक साधारण सभा ता. ११ डिसेंबर रोजीं भरली होती, त्यावेळीं कंपनीच्या ३० एप्रिल, १९३८ अखेरचा बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा रिपोर्ट आणि ताळेबंद व हिशेब ह्यांस मान्यता देण्यांत आली. १९३८–३९ सालाकरितां ऑडिटरचे जागीं श्री. जी. डी. आपटे ह्यांची पुनः नेमणूक झाली. कंपनीचे तीन डायरेक्टर्स, खा. ब. मेहता, सरदार मुजुमदार आणि शेठ राजमल लखीचंद हे पाळीप्रमाणें निवृत्त झाले होते, त्या जागांची पुनः निवडणूक झाली. कंपनीस आगीच्या विम्याचें आणि इतर प्रकारच्या विम्याचें काम करण्यास एका विशेष ठरावानें भागीदारांनीं मंजुरी देऊन त्या बाबतचे अधिकार बोर्डाकडे सोंपविले. ह्यासंबंधांत योजना हातीं घेण्यापूर्वी भागीदारांचा सल्ला घेण्यांत येईल असें आश्वासन बोर्डातर्फे देण्यांत आलें.

भागीदारांच्या विशेष साधारण सभेनें ॲक्चुअरीच्या तृतीय मूल्यमापनास आणि त्यावरील बोर्डाच्या रिपोर्टास मंजुरी दिली आणि भागीदारांस ७ टक्के दरानें डिव्हिडंड आणि विमेदारांस १८ आणि १५ रुपये दरानें वार्षिक बोनस देण्याविषयींची ॲक्चुअरीची आणि बोर्डाची शिफारस मान्य केली.

कंपनीच्या विमेदारांची सभा त्याच दिवशीं भरून तिनें विमेदारांतर्फे डायरेक्टरची निवडणूक केली.

---

## जाहीर विनंति

अखिल भारत ग्रामोद्योग संघानें वर्धा येथें एक लांकडी तेलघाणी तयार केली आहे. जुन्या तेलघाणीपेक्षा त्यांत बरीच सुधारणा केलेली आहे. ह्या तऱ्हेची तेलघाणी हरिपुरा येथें भरलेल्या प्रदर्शनांत चालवून दाखविली होती. बेळगांव येथें शेतकी प्रदर्शन भरलें होतें तेथेंहि ह्या तऱ्हेची घाणी ठेविली होती. विजापूर, एखलपुर, कोरेगांव, भुसावळ व कासारे ह्या ठिकाणीं गेल्या मार्च महिन्यांत ह्या तेलघाण्या चालू करण्यासाठी मुंबई सरकारनें दर घाणीमागें ४० रुपये दिले. त्याचप्रमाणें यंदाहि दर घाणीमागें ४० रुपये वीस घाण्यांसाठी ग्रामोद्योग संघाच्या मुंबई प्रांतिक कमेटीमार्फत देण्याचे सरकारनें मंजूर केले आहेत. तरी ग्रामोद्योग संघ, चरखा संघ, सहकारी संस्था, काँग्रेस संस्था, ह्यांपैकी कोणाहि कार्यकर्त्यांची वरील घाणी आपले गांवीं चालविण्याची इच्छा असेल तर त्यांनीं मला कळवावें. एके ठिकाणीं दोन घाण्या मिळूं शकतील. तेलघाणीसंबंधीं माहिती वर्धा येथील ग्रामोद्योग संघाकडे मिळते, व त्या माहितीच्या आधारें चांगल्या कारागिराकडून ही स्थानिक ठिकाणीं तयार होऊं शकते. वर्धा येथें ह्या घाणीची किंमत ५२ रुपये पडते. तरी वर विनंति केल्याप्रमाणें शक्य तितक्या लवकर मला लिहून कळवावें.

वैकुंठ ल. मेहता.
सभासद,
व्यवस्थापक मंडळ, अ. भा. ग्रामोद्योग संघ.

पोष्ट बॉक्स नंबर ४७२
मुंबई तारीख १०।१२।३८.

---

### लष्करांतील आणि नाविक दलांतील भरती

हिंदी लष्करांत १९३६-३७ मध्यें १६,४७० आणि १९३७-३८ मध्यें १८,३२६ उमेदवार घेण्यांत आले. त्यांपैकीं १४,३२० हिंदु आणि १४,१७२ मुसलमान होते. नाविक दलांत ह्या दोन वर्षांत अनुक्रमें १३२ आणि २४२ लोकांची भरती करण्यांत आली, त्यांपैकीं २७ हिंदु आणि २८० मुसलमान होते.

## हिंदी आयुर्विम्याची प्रगति

**( १९३६ चे ताजे आकडे )**

**सन १९२७ शी तुलना**

सन १९२७ सालीं हिंदुस्थानांत हिंदी कंपन्यांकडे एकूण ६० कोटि रुपयांचे विमे चालू होते; १९३६ मध्यें १७५ कोटि रुपयांचे विमे चालू होते. ह्या वर्षी ३८ कोटि रुपयांचे नवीन विमे उतरले गेले. सर्व हिंदी कंपन्यांस मिळून हप्त्यांचे रूपानें ११ कोटि, १५ लक्ष रुपये उत्पन्न मिळालें.

कंपन्यांची प्रांतवार वाटणी

विमा कंपन्यांची प्रांतवार वाटणी खालीलप्रमाणें आहे:— मुंबई : ६९; बंगाल : ५०; मद्रास : ४१; पंजाब : ३०; संयुक्त प्रांत : १९; दिल्ली : १०; मध्यप्रांत : ९; बिहार : ४; सिंध : ३; अजमीर–मारवाड : ३; आसाम : २; ब्रह्मदेश: २; सरहद्दप्रांतः १.

१९३६ मध्यें मिळालेलें काम

हिंदी आणि विदेशी कंपन्यांस १९३६ मध्यें खालीलप्रमाणें काम मिळालें:—

| | विमे | विम्याची रकम | हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|
| हिंदी कंपन्या | २,३९,००० | ३६ कोटि रु. | १ कोटि, ८४ लक्ष |
| विदेशी कंपन्या | ३४,००० | १०¾ ,, ,, | ५७ लक्ष |

चालू काम

१९३६ अखेर चालू असलेल्या कामाचा तपशील खालीलप्रमाणें आहे:—

| | विमे | विम्याची रकम | हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|
| हिंदी कंपन्या | ९,८९,००० | १६८ कोटि रु. | ७ कोटि ८७½ लक्ष |
| विदेशी कंपन्या | २,७२,००० | ९३ कोटि रु. | ५ कोटि १२½ लक्ष |

परदेशांत मिळविलेलें काम

हिंदी विमा कंपन्यांनीं ब्रिटिश ईस्ट आफ्रिका, सिलोन, स्ट्रेट सेटलमेंट्स् इत्यादि देशांत मिळून १ कोटि, ८० लक्ष रुपयांचें नवीन काम १९३६ सालीं मिळविलें. हिंदी कंपन्यांकडे चालू असलेल्या परदेशांतील विम्यांची एकूण रकम ७ कोटि रुपये असून त्यांच्या वार्षिक हप्त्यांचें उत्पन्न ३६½ लक्ष रुपये आहे.

कंपन्यांची वर्गवारी

हिंदी विमा कंपन्यांपैकीं १८५ केवळ आयुर्विम्याचें काम करतात, २८ कंपन्या आयुर्विम्याप्रमाणें इतर विमेहि स्वीकारतात आणि १९ कंपन्या फक्त इतर प्रकारच्या विम्याचेंच काम करतात. विदेशी कंपन्यापैकी १२ कंपन्या केवळ आयुर्विमे स्वीकारतात, १३ कंपन्या इतर विमेहि घेतात आणि १२२ कंपन्या फक्त इतर प्रकारच्याच विम्याचा धंदा करतात. वरील आयुर्विम्याचें काम करणाऱ्या ( १२ अधिक १३ = २५ ) २५ कंपन्यांपैकी १६ कंपन्या ग्रेट ब्रिटनमध्यें नोंदलेल्या आहेत.

विदेशी कंपन्यांस मिळालेलें काम

१९३६ सालीं ब्रिटिश कंपन्यांस हिंदुस्थानांत ४½ कोटि रुपयांचें काम मिळालें, ब्रिटिश साम्राज्यांतील इतर ७ कंपन्यांनीं मिळून ५ कोटि, १२½ लक्ष रुपयांचे विमे स्वीकारले, एका जर्मन कंपनीनें १ कोटि रुपयांचें काम मिळविलें आणि एका स्विस कंपनीकडे १२½ लक्ष रुपयांचें काम आलें.

इतर प्रकारचे विमे

आयुर्विमा वगळून बाकीच्या हिंदुस्थानांतील विम्याच्या वार्षिक हप्त्यांची बेरीज २¾ कोटि रुपये भरते. ह्यापैकी हिंदी कंपन्यांच्या वाट्यास ¾ कोटि रुपये आणि विदेशी कंपन्यांच्या वाट्यास २ कोटि रुपये येतात. ह्या उत्पन्नाची वर्गवारी खाली दिली आहे:—

कंपन्यांचें उत्पन्न ( आयुर्विमा वगळून )

| | आगीचा विमा | आगबोट विमा | इतर |
|---|---|---|---|
| हिंदी कंपन्या | ३६ लक्ष रु. | ११ लक्ष रु. | २७ लक्ष रु. |
| विदेशी कंपन्या | १०१ ,, ,, | ४१ ,, ,, | ५८ ,, ,, |

व्याजी लावलेली जिंदगी

हिंदी कंपन्यांनीं आपले पैसे मुख्यतः ( सुमारें ७० % ) रोख्यांत आणि भागांत गुंतविलेले आहेत. विदेशी कंपन्यांनीं आपल्या जिंदगीपैकी ४९ कोटि रुपये हिंदुस्थानांत व्याजी लावलेले आहेत.

## इन्कमटॅक्स बिलावर असेंब्लींत चर्चा

बँका आणि सावकार ज्या खातेदारांस वर्षाचे अवधींत २०० रुपयांपेक्षा अधिक व्याज देतात, त्यांविषयीं तपशील पुरविण्याची जबाबदारी बँका आणि सावकार ह्यांचेवर इनकमटॅक्स बिलानें टाकली होती. २०० रुपयांचे ऐवजी ४०० रुपयांची मर्यादा असावी, अशी दुरुस्ती आतां असेंब्लीनें केली आहे.

* * *

उत्पन्नासंबंधीं पत्रक भरून पाठविण्याविषयींची साधारण नोटीस दिल्यानंतर, प्राप्तीवरील करास पात्र असणारानें आपल्या उत्पन्नाचा तपशील सादर केलाच पाहिजे, अशी मूळ बिलांत तजवीज होती. ३½ हजारांखालील उत्पन्नदारांचे बाबतींत तपशील न देणारांस शासनाची माफी सिलेक्ट कमिटीनें मिळवून दिली. उत्पन्नाचा तपशील देण्याची सक्ती करणारें कलम बिलांतून अजिबात वगळण्यांत यावें, अशी सूचना असेंब्लींत करण्यांत आली, ती नामंजूर झाली.

* * *

प्राप्तीचा तपशील सादर करण्याची मुदत ३० दिवसांची ६०-दिवस करण्यांत येणारी दुरुस्ती असेंब्लीनें मान्य केली.

* * *

हिंदू कुटुंबाचें विभक्तीकरण झालेलें आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचा अधिकार बिलानें इनकमटॅक्स अधिकाऱ्यांस दिला आहे, तो काढून टाकणारी दुरुस्ती असेंब्लींत मंजूर झाली.

* * *

इनकमटॅक्स ॲक्टाच्या चवथ्या कलमान्वयें उत्पन्न कोठेहि होवो, त्यावर कर लादला जावा, अशी तरतूद आहे; तिचे ऐवजीं हिंदुस्थानांत आणल्या जाणाऱ्या प्राप्तीवरच आकारणी व्हावी अशी दुरुस्ती श्री. अणे ह्यांनीं मांडली ती नामंजूर झाली.

* * *

कॉंग्रेस पक्ष आणि मुस्लिम लीग पक्ष ह्यांच्या संमतीनें वरील चवथ्या कलमांत कांहीं सुधारणा करण्यांत आल्या. त्या अन्वयें भांडवल हिंदुस्थानाकडे आकर्षलें जाईल अशी तरतूद झाली असुन आतां कर बसविण्याचे दृष्टीनें कायम आणि तात्पुरता नागरिक एवढाच फरक राखण्यांत आला आहे. हिंदुस्थानांत तात्पुरतें वास्तव्य करणारानें ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर मिळकत केली, तर ती करास पात्र होणार नाहीं. मात्र ती मिळकत हिंदुस्थानांतुन नियंत्रण केल्या जाणाऱ्या धंद्याबाबत असेल अगर ती हिंदुस्थानांत आणण्यांत आली असेल, तर मात्र तीवर कर लादला जाईल.

* * *

सध्यांच्या कायद्यानुसार हिंदुस्थानांतील संस्थानांमधील शेतीच्या उत्पन्नावर, तें उत्पन्न संस्थानांत कर भरीत असल्यास, कर आकारला जात नाहीं. इनकमटॅक्स बिलानें ही माफी काढून टाकली आहे. मूळ योजना कायम राखणारी एक सूचना श्री. दत्त ह्यांनीं मांडली, ती नामंजूर झाली.

* * *

## पुरंदर तालुका सहकारी परिषद

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें भरविण्यांत आलेली ही परिषद ता. ७-१२-३८ रोजीं सासवड येथें श्री. द. दि. चितळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. आपल्या प्रास्ताविक भाषणांत अध्यक्षांनीं तालुक्यांतील सहकारी चळवळीची परिस्थिति निवेदन करून त्यांत कोणत्या प्रकारच्या सुधारणा होणें आवश्यक आहे हें सांगून या चळवळीची कास शेतकऱ्यांनीं धरली नसती तर शेतकऱ्यांची परिस्थिति आणखी खालावली असती असें आपलें निर्विवाद मत असल्याचें सांगितलें. नंतर नियोजित अध्यक्ष श्री. बापुराव गोखले यांचेकडून आलेलें पत्र वाचून दाखविण्यांत आलें. त्यांत त्यांनीं परिषदेस येण्याची प्रबल इच्छा असून परिषदेस येतां आलें नाहीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून परिषदेस यश चिंतिलें होतें व नवीन घटनेबाबत प्रतिकूल मत प्रदर्शित केलें होतें.

परिषदेंत एकंदर आठ ठराव पास झाले. मुख्य महत्त्वाचा ठराव इन्स्टिट्यूटच्या घटनेबाबत होता. इतर ठरावांत नवीन पतपेढ्या स्थापन करणें, विशेषतः क्रयविक्रय संस्था काढणें, ग्रुप सेक्रेटरी नेमणें, पंचांस पारितोषिकें देणें, हुकुमनाम्यांची ताबडतोब बजावणी होईल अशी व्यवस्था करणें, लवाद कोर्ट तालुका निहाय स्थापन करणें व रद्द झालेल्या संस्थांचे हिशेब लवकर पुरे होतील या दृष्टीनें लायक व तज्ञ इसमांची लिक्विडेटर म्हणून नेमणूक करणें, वगैरे ठराव होते.

इन्स्टिट्यूटच्या घटनेबाबतचा खालील प्रमाणें ठराव सर्वानुमतें पास झाला " इन्स्टिट्यूटच्या घटनेसंबंधानें विचारांत असलेल्या योजनेवरून इन्स्टिट्यूट ही संस्था यापुढें सहकारी चळवळींत कमजोर होणार आहे व त्या योगानें सहकारी चळवळींतील प्रश्नांची दाद लावून घेण्याचा एक प्रमुख मार्ग निरुपयोगी होणार आहे असें वाटत आहे. या करितां या परिषदेची इन्स्टिट्यूटच्या मुंबई येथील मुख्य कचेरीस अशी सूचना आहे कीं ज्या योजनेच्या योगानें इन्स्टिट्यूटचें महत्त्व, कार्य, उपयुक्तता व शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व यास कमीपणा येईल अशा कोणत्याही योजनेस तिनें मान्यता देऊं नये. तसेच या परिषदेची आणखी अशीहि सूचना आहे कीं, इन्स्टिट्यूटची विचारांत असलेली घटना इन्स्टिट्यूटच्या मान्यतेसाठी अखेरच्या स्वरुपांत तिच्याकडे येईल तेव्हां ती घटना इन्स्टिट्यूटच्या जनरल सभेपुढें ठेवण्याचे अगोदर इलाख्यांतील सर्व सहकारी संस्थांकडे विचारासाठी पाठविण्यांत यावी व नंतर ती घटना इन्स्टिट्यूटच्या जनरल सभेपुढें विचारास ठेवण्यांत यावी अशी या परिषदेची इन्स्टिट्यूटच्या मुंबईच्या मुख्य कचेरीस आग्रहाची सूचना व विनंती आहे."

---

### जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

ता. १० व ११ रोजीं कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेक्निकल एज्युकेशन तर्फे झालेल्या टेलर्स सर्टिफिकेट परीक्षेकरितां आलेले परीक्षक मि. बॉल यांनीं जाधव टेलरिंग कॉलेजला भेट दिली व तेथील व्यवस्था आणि शिवणकलेस लागणारीं उपयुक्त साधनें व सरकारी परीक्षेंत विद्यार्थ्यांनीं दाखवलेल्या प्राविण्याबद्दल त्यांनीं प्रशंसोद्गार काढले.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११६—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०२—२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—३ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८—८ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०५—२ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९९—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षें मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... ... | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४८-१२-० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७१—४ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२३-१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७०-१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३०२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४१५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९५१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४१-१२ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १७-१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३७-१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१०-१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १५९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३०८—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १४६५-० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १०७-१२ |

अप–टु–डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर




**पराडकर टेलर्स ॲकॅडेमि** ( ६७२ सदाशिव पुणें २ )

व

**टेलरिंग फर्म** ( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां कापड व सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त तज्ञ पदवीधर व अनुभविक शिक्षकांकडून पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**पाहिजेत !** खालील सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्रांत व कर्नाटकांत कांहीं ऑर्गनायझर व एजन्ट्स पगारी कमिशनवर नेमणें आहेत.

**दि ग्रेट सोशल लाइफ अँन्ड जनरल अॅशुअरन्स कं. लि.**

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा

चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult

**V. G. & Sons**

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

**☞ फर्म, कंपनी आणि सोसायटी**

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "**न्यायबोध**" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व. ट.ख. सह फक्त ५ रु. नमुना अंकासाठीं सात आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर,

"**न्यायबोध**" मासिक, नागपूर शहर.

हें पत्र पुणें, पेठ मोबुदा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मोबुदा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.